# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं १३/२०१८**

१. सौ. प्रज्ञा काशिनाथ कांबळे } तक्रार अर्जदार

विरूध्द

२. श्री. वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे, खुर्द
३. वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, जि. सांगली } वि. प.

तक्रारीचे स्वरूप:

तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार यांची नेमणूक दि. ११/०७/२००३ रोजी झाली आहे. तक्रारदार यांची मराठी विषयाकरिता सहाय्यक प्राध्यापक पदावर वारणा महाविद्यालयामध्ये कार्यरत आहेत. तक्रारदार यांनी दि. १७/०६/२०१४ रोजी नम्र निवेदन करून मा. प्र. प्राचार्य यांचे बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा इस्लामपूर खाते नं. २०२२४२००७८९ या खात्यावर मे, २०१३ मध्ये सहावा वेतन आयोग फरक रक्कम अद्यापही जमा न करणे व तसेच विविध मागण्या करणारे नम्र निवेदन दिले म्हणून मा. प्र–प्राचार्य यांनी जुलै २०१४ ची वार्षिक वेतनवाढ कोणत्याही प्रकारची चौकशी न करता रोखली आहे.

या संदर्भात विचारणा करणारा पत्रव्यवहार दिनांक १३/०८/२०१४ रोजी करून व स्मरणपत्र दि. १७/१०/२०१४ रोजी देवूनही कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. तरी रोखलेली वेतनवाढ देण्याविषयी संबंधितांना आदेश व्हावेत. सहाव्या वेतन आयोगाची फरक रक्कम देण्याविषयी संबंधितांना आदेश व्हावेत.

संस्थेचा अभिप्राय:

तक्रारीसंदर्भात संस्थेने दिलेला लेखी अभिप्राय खालीलप्रमाणे –

१. सेवाप्रारंभापासून आजअखेर सेल्फ ॲपरायजल/ए.पी.आय. फॉर्म भरून दिलेले नाहीत.
२. सेवाप्रारंभापासून काम असमाधानकारक.

३. महाविद्यालयांतर्गत कामामध्ये असहभाग दाखवून कामामध्ये व्यत्यय आणणे.

४. सातत्याने पत्रव्यवहार करून महाविद्यालय व संस्थेची बदनामी करणे.

५. वेतनवाढ रोखणेसंदर्भात संस्थेने दिलेला आदेश.

महाविद्यालयाचा अभिप्राय:

१) प्रा. श्रीमती पी.के. कांबळे यांना दि. १७/०६/२००० च्या भरती बंदी आदेशानुसार विद्यापीठाची तात्पुरती मान्यता आहे. मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडून सन २००८—०९ ते २०११—१२ या कालावधीतील अनुदान निर्धारणामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनाची १५,८०,३१४/— इतकी वसूली दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रा. श्रीमती. पी. के. कांबळे यांना देय असलेली ६ वा वेतन आयोगाची फरक रक्कम देणेसंदर्भात मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांना नेमणूकीसंदर्भात तपासणी करून फरक रक्कम दिल्यानंतर पुन:श्च चुकीच्या नेमणूकीसंदर्भात फरकाची रक्कम अमान्य करू नये याबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु त्यांचेकडून अद्याप उत्तर न आल्याने फरक रक्कम अदा केलेली नाही.

२) प्रा. श्रीमती. पी. के. कांबळे यांनी महाविद्यालय सेवेत आल्यापासून सेल्फ ॲपरायजल व ए.पी.आय. फॉर्म भरून दिलेले नाहीत. प्राचार्य यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये टाळाटाळ करणे, वरिष्ठांवर खोटे आरोप करणे, सातत्याने महाविद्यालयात उशिरा येणे, विनापरवानगी गैरहजर राहणे इ. कारणांमुळे माहे जुलै, २०१४ पासून वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे.

संस्थेतर्फे डॉ. प्रताप पाटील समितीसमोर उपस्थित. त्यांनी मांडलेल्या म्हणण्यानुसार तक्रारदार यांनी महाविद्यालय व संस्थास्तरावर चर्चेने सुटणाऱ्या प्रश्नासंबंधी अनावश्यक पत्रव्यवहार केलेने महाविद्यालय व संस्थेची बदनामी झाली आहे. तसेच सेल्फ ॲपरायजल व ए.पी.आय फॉर्म भरून दिले नसलेने तक्रारदार यांची माहे जुलै २०१४ पासून वार्षिक वेतनवाढ संस्था आदेशानुसार रोखण्यात आलेली आहे.

सदरचे प्रकरण समितीसमोर असताना तक्रारदार यांनी दि. २७/०८/२०१८ रोजी सहावा वेतन आयोग फरक रक्कम मिळाली

आहे. तसेच वेतनवाढीच्या संदर्भात कायदेशीर बाबी बघून संस्थेने निर्णय घेण्याचे ठरविले असलेने तक्रार अर्ज निकाली काढणेत यावा असे पत्र दिले. तथापि दि. २७/०९/२०१८ रोजी तक्रारदार यांनी वेतनवाढबाबत संस्था व महाविद्यालयाकडून कोणतीही कार्यवाही न झालेने वेतनवाढ न दिलेबाबत तक्रार अर्ज पुढे चालविणेस लेखी विनंती केली.

समितीच्या असे निर्देशनास आले आहे की, तक्रारदार यांची रोखण्यात आलेली वेतनवाढ ही कायमस्वरूपी आहे किंवा कसे याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. सबब वेतनवाढ रोखण्यापूर्वी नैसर्गिक न्यायतत्वाचा अवलंब केलेचे दिसून येत नाही. शिक्षक परिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही केलेचे दिसून येत नाही. संस्थेने वेतनवाढ रोखण्याबाबतची कायदेशीर बाबी पाहून निर्णय घेतलेला नाही, परिनियमातील कार्यपद्धतींचा अवलंब करून तक्रारदार दोषी आढळल्यामुळे त्यांची वेतनवाढ थांबली असल्याबाबत समाधानकारक म्हणणे समितीसमोर आले नाही. त्यामुळे संस्थेची वेतनवाढ रोखण्याबाबतची कार्यवाही न्यायाच्या अनुषंगाने मान्य करता येणार नाही.

**आदेश**

तक्रारदार यांचा तक्रारअर्ज मंजूर करण्यात येत आहे. संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांची जुलै २०१४ पासून रोखलेली वार्षिक वेतनवाढ त्वरीत चालू करण्यात यावी. वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत संबंधित तक्रारदार, संस्था आणि महाविद्यालय यांना देऊन तसे कळविण्यात यावे.

दि. २१/०५/२०१९

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

**अध्यक्ष**
**(श्री. ना. गुं. पाटील)**

**सदस्य**
**(श्री. अ. अ. कुलकर्णी)**

**सदस्य**
**(श्री. प्र. द. राऊत)**

**सदस्य**
**(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)**

**सदस्य सचिव**
**(श्रीमती. अ. अ. कदम)**